# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २०/०७/२०२२ (बुधवार)**

**(दुपार)**

---

### विनयभंग

**पो.स्टे. जलालखेडा** :– दिनांक १९/०७/२०२२ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी/पीडित वय १६ वर्ष हि मामाचे मुलास शाळेत सोडुन घरासमोर आली असता आरोपी नामे– शाहरूख खान अनवरखान पठाण वय २६ वर्ष रा. वार्ड क्र. ३ जलालखेडा याने फिर्यादीस 'तुझेच क्लासमध्ये मला रीॲडमीशन करावयाची आहे' असे म्हटले तेव्हा फिर्यादी रडत–रडत घरी जावुन आईला सांगितले असता आईने आरोपीस हटकले. तेव्हा आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला व थापडा मारल्या. तसेच फिर्यादीचे भावास देखील आरोपीने मारहाण केली. तसेच यापुर्वी देखील फिर्यादी ही १० व्या वर्गात असतांना काहीना काही बोलण्याकरीता आरोपी हा तिचा पाठलाग करीत होता.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ (ड), ३२३, ५०४, ५०६ भादंवी. सहकलम ११ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि काकडे मो.क्र. ९५११८३४७५४ या करीत आहे.

### अपघातात मृत्यु

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत १३ कि. मी. अंतरावरील दिग्रस फाटा पारडसिंगा येथे दिनांक १९/०७/२०२२ चे १९.१० वा. ते १९.२० वा. फिर्यादी नामे– अमोल संतोष धुर्वे वय २७ वर्ष रा.मरामाय नगर काटोल हा त्याचे मोटार सायकल बजाज प्लाटीना क्र.एम.एच–४०/सी.बी–७९४१ वर बसुन मामा नामे सुखदेव मारोतराव उईके (मृतक) वय ४२ वर्ष रा.मोहगाव जंगली यांचे सह जात असता कोणत्यातरी अज्ञात वाहनाने कट मारल्याने मोटार सायकलवरल नियंत्रण सुटुन रोडचे काठावर पडले. या अपघातात फिर्यादीस डोक्याला व पायाला मार लागला तसेच मोटारसायकल चालक सुखदेव मारोतराव उईके यांना डोक्याला मार लागुन जागेवरच मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९३३७,३०४(अ) भादवी सहकलम १८४,१३२,१३४ मोवाका. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री चव्हाण ९५४५३६३१२१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**